# महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे “आयडॉल्स”

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ “कृषि पदवीधर आयडॉल”

### श्री. ऋषीकेश राजकुमार भोसले

कृषि उद्योजक, बी. एस्सी. (कृषि) कृषि महाविद्यालय, कोल्हापूर

मु. पो. नरंदे, ता. जि. कोल्हापूर




**उद्योगाचे नांव**
- श्रीराम फ्लॉवर्स, कोल्हापूर

**कृषि उद्योगाची माहिती**
- सन २०१८ पासून सुरुवात

**उद्योगामधील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान**
- कोल्हापूर सारख्या ऊस, गहु व भातासारख्या पीक पध्दती असलेल्या जिल्ह्यातून कट फ्लॉवर्स लागवडीमध्ये लक्ष घातले
- कट फ्लॉवर्स लागवड, पॅकेजिंग व मार्केटींग या विषयाची माहिती घेऊन वडिलांच्या प्रेरणेने व सहकार्याने फुलांचा व्यवसाय करण्याचे ठरविले
- रु. ५० लाख रुपयांच्या गुंतवणुकीतुन फुलांच्या शेतीचे युनिट सुरु
- कट फ्लॉवर्स मधील अनेक सुधारीत वाणांबरोबरच जरबेरा, गुलाब, लिमोनियम, कामिनी या बरोबरच अनेक प्रकारच्या फुलांची लागवड
- हवामानातील बदलानुसार व मार्केटमधील योग्य वेळेच्या संधीनुसार फुलशेतीची लागवड व त्याचे व्यवस्थापनाच्या स्वतःच्या अनेक पध्दती विकसीत केल्या
- कोल्हापूर शहरात फुलांचे शॉप सुरु करुन अल्पावधीतच कोल्हापूरातील कट फ्लॉवर्सचे व बुके यांच्या बरोबरच सजावटीसाठी लागणारे कृत्रिम फुलांचे फोम, फ्लोरल टेप्स,कट फ्लॉवर्सचे सुशोभिकरण यांची शहरातील प्रमुख वितरक म्हणुन तसेच कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांमध्ये प्रमुख पुरवठादार
- भविष्यात संपूर्ण भारतभर तसेच परदेशातही आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये फुलांच्या निर्यातीसाठी प्रयत्न

**वार्षिक उलाढाल : रु. ५ कोटी**

**व्यावसायिक / सामाजिक क्षेत्रातील योगदान**
- शेतकऱ्यांनी फुलशेतीच्या माध्यमातुन आपले जीवनमान उंचवावे यासाठी शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना फुलशेतीचे महत्व तसेच भारतीय व जागतिक बाजारपेठेत फुलांना मिळणारा उच्चदर या विषयी माहिती देऊन अनेक शेतकऱ्यांना फुलशेती करण्यासाठी प्रवृत्त केले
- कट फ्लॉवर्स मधील नविन वाण परदेशातून आयात करुन त्यांचे परीसरातील शेतकऱ्यांना वितरण
- गावातील चार मोठ्या शेतकऱ्यांना फुलशेती करण्यासाठी प्रवृत्त केले

**रोजगार निर्मिती**
- १५ व्यक्तींना नियमित रोजगार दिला









## महात्मा फुले कृषि विद्यापीठ “शेतकरी आयडॉल”

### श्री. हिम्मतराव बाबुराव माळी
### सौ. विमलताई हिम्मतराव माळी

मु. पो. न्याहाली, ता. जि. नंदुरबार




**शिक्षण** : एस. एस. सी.

**जमीनधारणा क्षेत्र** : ३.४६ हेक्टर

**सध्या घेत असलेली पिके** : भाजीपाला पिके, पेरु, शेवगा व दुग्ध व्यवसाय

**शेतीमधील उल्लेखनीय संशोधन कार्य**
- ताटीपध्दतीने कारले पिकाची लागवड
- हवामान बदलाचा परिणाम होऊ नये म्हणून शेडनेटमधील संरक्षित तंत्रज्ञानाचा वापर
- घनदाट पेरु लागवड तंत्राचा वापर
- सेंद्रिय भाजीपाला उत्पादनाचा उत्तम हातखंडा
- बाजारपेठेच्या मागणीनुसार भाजीपाल्याच्या विविध पिकांची वर्षभर लागवड
- जास्त कालावधीच्या पिकांमध्ये कमी कालावधीच्या भाजीपाला पिकांचा आंतरपिक म्हणून वापर
- शेवग्याची शबनम नावाची स्थानिक जात विकसीत करुन व विक्री व्यवस्थापनातून बाजारामध्ये हिम्मतराव का शेवगा अशी स्वतंत्र ओळख निर्माण केली
- शेतीला जोडधंदा म्हणून सन २०१४ पासून दुग्ध व्यवसाय सुरु केला

**स्वत:निर्माण केलेल्या सेंद्रिय निविष्ठा**
- मेथी, कोथिंबीर, मुळा, पोकळा भाजी, वांगी, कोबी व गुळ असे समप्रमाणात घेऊन तीन महिने सडवुन पिकांवर फवारणी केल्यास फळांची वाढ व चकाकी उत्तम येते
- दुध, दही व हिंग असे मिश्रण करुन पिकांवर फवारल्यास जास्त फुलांची निर्मिती होते
- शेण, गोमुत्र व निंबोळी अर्क यांचे मिश्रण या उत्तम खताचा नियमीत वापर

**वार्षिक उत्पन्न : रु. ८ ते १० लाख**

**तंत्रज्ञानाचा प्रसार**
- महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष या नात्याने नंदुरबार जिल्ह्यात प्रसार केला
- सह्याद्री वाहिनी तसेच आकाशवाणीव्दारे मुलाखतीच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा प्रसार केला

**पुरस्कार**
- सह्याद्री दुरदर्शन कृषि सन्मान पुरस्कार - २००९
- कृषि क्षेत्रातील उल्लेखनिय कार्यासाठी समाजभुषण पुरस्कार - २०१०
- कृषि विभाग, आत्मा, नंदुरबार - आदर्श शेतकरी पुरस्कार - २०१३
- वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार - २०१७
- मनुष्यबळ विकास संस्था, मुंबई - कृषिरत्न पुरस्कार - २०१९








## विस्तार शिक्षण संचालनालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मे,२०२३